Aayushi International Interdisciplinary Research Journal(Indexed With IIJIF and IJIndex)
Vol - III Issue-VIII AUGUST 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

# बालविकासाचा अभ्यास - आधुनिक समाजाची गरज

The Study of Child Development - Modern Social Need

प्राचार्य कुलकर्णी कांचन प्रकाश
एम.ए.(भूगोल), एम.एड. डी.एस.एम.

मानवी जीवनामध्ये गर्भधारणेपासून कुमारावस्थेपर्यंत होणारी वाढ आणि परिवर्तने यांचे अध्ययन बालविकासात होत असते.विकास ही कल्पना मजबुत आहे आणि विकासात शारीरिक, बोधात्मक आणि वर्तनात्मक अशा तिन्ही अंगांचा समावेश होत असतो. बाल विकासात वाढ व परिपक्वता याचा विशेष महत्व असते.

- परिपक्वता व अनुभव यांच्या एकत्रित परिणामातमन घडून येणाऱ्या परिवर्तनाच्या मालिकेला ' विकास ' असे म्हणले जाते. एखादयाची उंची वाढली म्हणजे विकास नव्हे तर अनेक कार्ये एकत्र करण्याची ती एक प्रक्रिया असते. तसेच विकासात गुणात्मक परिवर्तन अपेक्षित असते.
- गर्भधारणेपासून ते परिपक्वतेपर्यंत मुलांची झालेली शारीरिक, मानसिक व बौध्दिक वाढ म्हणजे ' बालविकास ' होय.
- गर्भधारणेपासून ते परिपक्वतेच्या काळापर्यंत मुलांची वाढ व विकास यांचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास ज्या शास्त्रामध्ये केला जातो त्या शास्त्राला ' बालविकास शास्त्र ' असे म्हणतात.
- गर्भधारणेपासून ते परिपक्वतेपर्यंच्या बालकांची होणारी शारीरिक वाढ ,त्यातील परिपक्वता आणि होणारा सर्वांगीण विकास याची अविरत चालणारी प्रक्रिया म्हणजे ' बालविकास ' होय.

विकास या संकल्पनेत वाढ ही संकल्पना दडलेली असते. वाढ या शब्दाने संख्यात्मक बदल सूचविले जातात. विकासात वाढीबरोबर झीज ही संकल्पना समाविष्ठ असते. याचाच अर्थ विकास या संकल्पनेत वाढ व झीज यांचाही अंतर्भाव होतो. विकास ही सतत चालणारी प्रक्रिया असते . त्यामध्ये सातत्याबरोबरच क्रमबध्दता व सुसूत्रता प्रामुख्याने आढळून येते.

## बालविकासाच्या अवस्था :-

व्यक्तिवर्तन समजून ध्यावयाच असेल तर त्यासाठी बालविकास, बालसंगोपन यांचे अध्ययन करणे आवश्यक आहे. बालविकासाचे वेगवेगळे टप्पे असतात. त्या टप्प्यांमधील बालकांचा शारीरिक, भावनिक, सामाजिक व बौद्धिक विकास समजून घेणे आवश्यक ठरते. विकासाच्या या टप्प्यांप्रमाणेच बालकांचे संगोपन करणे अतिशय आवश्यक व आजच्या काळाची अभ्यासपूर्ण संगोपन ही गरज होऊन बसलेली आहे. अभ्यासपूर्ण संगोपन केले तरच विकासाची उत्त्यूच्च पातळी गाठणे शक्य होते. प्रत्येक पालक आपल्या बालकांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी प्रयत्न करत असतो. मुलांचा सर्वांगीण विकास व्हावयाचा असेल तर त्यासाठी पोषक बातावरण त्यास पुरविले गेले पाहिजे. मुलांच्या आजच्या प्रगत समाजातील गरजा ओळखता आल्या पाहिजे. आपल्या काळातील नव्हे तर आजच्या मुलांच्या गरजांनुसार योग्य मार्गदर्शन करणे, वेगवेगळ्या अनुभवांची नवनवीन ओळख करुन देणे, मुलांच्या विकासाचे निर्णय घेणे आवश्यक असतात. बालविकासाच्या संदर्भात उपक्रम व कृतिशीलता महत्वाची ठरले. व्यक्तीच्या गुणात्क बदलांना विकास म्हणता येईल. व्यक्तीचे भाषिक कौशल्य, वर्तनबदल, भावना यात होणारे बदल म्हणजे 'विकास' असे म्हणता येते.

कोणताही विकास हा परिपक्वतेसोबतच होऊ शकतो. परिपक्वता आल्याशिवाय विकासाची प्रक्रिया सुरुच होत नाही. विकास हा मृत्यूपर्यंत सुरुच असतो. विकास विशिष्ट क्रमानेच होत असतो. परिपक्वता साध्य करण्यासाठी व्यक्तीमध्ये घडून येणाऱ्या क्रमबध्द व सुसंबध्द अशा बदलांची प्रगतशील मालिका म्हणजे 'विकास' होय. परिपक्वतेच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल म्हणजे ' विकास ' होय असे शरयुबाळ नावाचे विचारवंत म्हणतात.

गेसेल या मानसशास्त्रज्ञाच्या मते, बालविकास तीन प्रकारे होत असतो, रचनात्मक विकास, शारीरिक विकास, वर्तनात्मक विकास विकास होत असतांना बदल घडून येतात त्याचे विभस होत असताना बदल घडून येतात.

- **शारीरिक आकारमानात बदल :** मूल जसजसे वाढत असते तसतसे त्याच्या शरीराच्या आकारमानात बदल होत असतात. हा बदल विशिष्ट काळापर्यंतच असतो. लहान मूल झपाट्याने मोठे होते. त्याचे वजन वाढते व उंचीही वाढत असते.
- **शारीरिक प्रमाणबध्दतेत बदल :** बालकात बदल होत असतात. मोठे होत जाणारे मुलांचे अवयव पक्व होत जातात.शिवाय त्यांच्या वर्तनातही बदल होत असतो. लहानपणी वाटणारी भीती मोठेपणी नसते. बौध्दिक क्षमता वाढत असते. कल्पनाशक्ती वाढत असते. त्याचा उपयोग दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी केला जातो.
- **लक्षणांचा लोप:** व्यक्तीचा विकास होत असताना काही लक्षणे नष्ट होतात. व नवीन लक्षणे दिसू लागतात. विकास होत असताना काही नवीन लक्षणे दिसून येतात. जसे पायांचे स्नायू बळकट होऊन रांगणारे मूल चालायला लागते. विचारशक्ती प्रगल्भ होऊलागते, मुलांना वेगवेगळया विषयांत जिज्ञासा उत्पन्न होते.

**आधुनिक विकासाच्या अवस्था :**

व्यक्तीमध्ये विकासाची प्रक्रिया जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सुरुच असते. यात काही ठळक अवस्था असून त्या प्रत्येकाची विशेष वैशिष्ट्ये आढळून येतात. प्रत्येक अवस्थेतील वर्तनात फरक आढळतो.

1) **गर्भावस्था :** फलित अंडपेशी तयार झाल्यापासून ते मुलाच्या जन्मापर्यंतचा काळ गर्भावस्था समजला जातो. यामध्ये जलदगतीने विकास होतो. यात बालकाचे बजन कमीत कमी 2.5 कि.ग्रॅम असू शकते व जास्तीत जास्त 6.5 कि.ग्रॅम असू शकते. अंडावस्था, भ्रूणावस्था व गर्भावस्था असे यातील तीन भाग असतात.
2) **अर्भकावस्था** : बालकाच्या जन्मानंतर दोन आढवडे किंवा 14 दिवसांचा काळ म्हणजेच अर्भकावस्था होय. यास ' नवजात शिशू ' असेही म्हणतात. यात विकासाची गती पूर्वीच्या अवस्थेपेक्षा मंद झालेली असते. कारण शिशूंना वातावरणाशी जुळवून किंवा समरस होण्यास आपली शक्ती व वेळ खर्च करावी लागते.
3) **शैशवावस्था** : दोन वर्षे ते परिपक्वता येईपर्यंतचा काळ म्हणजे शैशवावस्था समजला जातो. यात एक वर्ष ते दोन वर्ष असा काळ असतो वयाच्या पहिल्या वर्षात मुलांच्या गरजा दुसऱ्यांवर अवलंबून असतात. तर दुसऱ्या वर्षात बऱ्याच गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करतात.
4) **बाल्यावस्था** : दोन वर्षे ते परिपक्वता येईपर्यंतचा काळ म्हणजे बाल्यावस्था होय. यातही दोन भाग दिसून येतात. शालापूर्व बाल्यावस्था जी की वयाच्या 2 वर्षापासून 6 वर्षापर्यंत समजली जात होती. मात्र अलिकडच्या काळात बालकाला वयाच्या 3 वर्षापासून प्ले ग्रुप वगैरे शाळांमध्ये प्रवेश देवू लागल्यामुळे याला शालापूर्व बाल्यावस्था म्हणणे उचीत वाटत नाही. तर दुसरी अवस्था शालय बाल्यावस्था होय. यामध्ये वय वर्षे 6 ते 12 असे गृहीत धरले जाते. यातील शालापूर्व अवस्था म्हणून जी संबोधण्यात येते तो काळ विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा समजला जातो. यात मुले स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करतात. भावी आयुष्याचा पाया याच काळात रचला जातो. योग्य ते संस्कार, वळण याच काळात केले जातात. यात जिज्ञासा दिसते, नवीन गोष्ट समजून घेण्याची प्रवृत्ती विकसित होत असते. तर शालेय अवस्थेत मुलांची शारीरिक व मानसिक वाढ झपाटयाने होत असते. सामाजिक विकासाचा पाया याच काळात रचला जातो. मुलगा शाळेत जातो तेव्हा त्याचा घराबाहेरील लोकांशी संपर्क येतो. इतर मुले, शिक्षक यांच्याशी कसे बोलावे, कसे वागावे हे शिकत असतो. कारक विकास, भाषिक आणि बौध्दिक विकास याच अवस्थेत झपाटयाने झालेला दिसून येतो. भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे तो शिकतो व स्वावलंबी वृत्ती वाढीस लागते.
5) **किशोरावस्था** : ही लैंगिक परिपक्वता येण्याची अवस्था असते. वयाच्या 13 व्या वर्षी ही अवस्था सुरु होते.असे सांगीतले जात होते मात्र निसर्गात झालेले बदल मानवामध्ये झालेल्या शारीरिक बदलांचे बदललेले वेळापत्रक याचा परिणाम म्हणून बालकांमध्ये किशोरावस्थेत जाणवणारे बदल हे वयाच्या 10 वर्षानंतरच दिसू लागले आहेत. त्यामुळे या सर्व अवस्थांमध्ये दर्शविण्यात आलेले वयोमान हे नैसर्गिकरित्या बदलत चालले आहे. किशोरपूर्वावस्था ही पूर्वी वयाच्या 13 ते 15 वर्षे वयोगटाची समजली जात असे मात्र अलिकडीच्या काळात झालेले बदल व नोंदविलेल्या नोंदीच्या आधारे हे किशोरपूर्वावस्था ही वयाच्या 10 व्या वर्षीच सुरु होऊ लागली असून वयाच्या 13 व्या वर्षापर्यंत हि अवस्था संपूण पूर्व किशोरावस्थेमध्ये म्हणजेच पूर्वीच्या 16 ते 17

वयोगटात होणाऱ्या अवस्थेत रुपांतर होऊ लागली आहे. अलिकडच्या काळात 13 ते 14 ही पूर्व किशोरावस्था झाली असून उत्तर किशोरावस्था ही पूर्वी वयाच्या 17 ते 19 वर्षे वयाची गृहीत धरली जात होती ती आता15 ते 16 वयोगटात दिसून येऊ लागली आहे.

याचाच अर्थ पूर्वीची 13 ते 25 वर्षे किशोरावस्था मानली जात होती. ती आता वयाच्या 9 ते 10 वर्षापासून सुरु होऊन वयाच्या 18 वर्षापर्यंत पूर्ण होऊ लागली आहे. त्यामुळे आता किशोरावस्था ही वयाचा 10 ते 17 वर्षे हा काळ समजला गेला पाहिजे. या अवस्थेत विकासाची गती वाढलेली असते. शारीरिक व मानसिक बदल होत असतात. उदा. लैंगिक बदल होतात. मानसिकदृष्ट्या विचार करण्याची क्षमता वाढीस लागलेली असते. अभिरुची निर्माण होऊ लागते. अवधान वाढलेले दिसून येते. लाजरेपणा व हळवेपणा वाढतो,गांगरणे, चिंता , कल्पनाविलासात रंगून जाणे या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात व धाडसी वृत्ती वाढते.

6) **प्रौढावस्था** : पूर्वी वयाच्या 18 ते 35 वय वर्ष हे प्रौढावस्थेचे समजले जात असे. आज हेच वय 17 ते 25 वर्षापर्यंतचा काळ प्रौढावस्थेमध्ये समाविष्ट करण्यात येणे गरजेचे आहे. व्यवसाय व नोकरी करणे व विवाहबध्द होणे या दोन महत्वाच्या घटना या अवस्थेत असतात. व्यक्ती सर्वच दृष्टीने परिपक्व बनते. कोणतही उद्‌भवलेली समस्या सोडविण्याची प्रवृत्ती वाढते. 25 ते 45 हा मध्यावस्थेचा काळ झालेला आहे. यात कार्यक्षमता कमी होते. केस पांढरे झालेले असतात. दातांच्या विविध तक्रारी येऊ लागतात. मुलांची लग्न, त्यांच्या आर्थिक स्थैर्याकरीता आलेले तणाव, नवीन पिढीशी करावे लागणारे समायोजन या गोष्टींना तोंड दयावे लागते.

7) **वृध्दावस्था** : अलिकडे शारीरिक कष्टाची कामे कमी होत गेल्यामुळे काटकपणा, तारुण्यातील आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष, आहाराकडे झालेले दुर्लक्ष, यामुळे शारीरिक दुर्बलता लवकर जाणवू लागली आहे. सहकाऱ्याचा मृत्यू, एकाकीपणा, नैराश्य, व्यसनाधिनता या व अशा अनेक कारणांमुळे वृध्दावस्थेचे वयोमानही कमी होऊ लागले आहे. तयाच्या 50 व्या वर्षीच गात्रे ढिली पडू लागली आहेत. त्यामुळे वृध्दावस्थेचे वय आता 50 वर्षे ते मृत्यू असा होऊन बसला आहे.

अशा प्रकारे काळाच्या बदलानूसार बालकाच्या वाढत्या वयामध्ये यापूर्वीच्या व्याख्यांमध्ये बदल करणे ही काळाची गरज झाली असून त्यानुसार विविध अभ्यासक्रमांमधून या बदलांच्या नोंदी घेणे आता गरजेचे वाटू लागले आहे. बालकाच्या विकासाचा अभ्यास करावयाचा असल्यास सद्य परिस्थितीत बालकाच्या विविध वयांमध्ये जाणवणारे बदल, घडणारी स्थितंतरे याचा अभ्यास योग्य पध्दतीने केल्यासच तो परिपूर्ण असा होवू शकतो.

**संदर्भ सूची**

- डॉ. किशोर चव्हाण (२०१०), अध्ययन आणि विकासाचे मानसशास्त्र इनसाईट प्रकाशन, नाशिक.
- सुरेश करंदीकर - अध्ययनाचे मानसशास्त्र
- Educational Psychology –J.C.Agarval
- Educational Psychology -S.K.Mangal